आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

KAYASTH
Caters & Event Management
Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३१२ वा गुरूवार दि ०५ मार्च २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शहा, फडणवीसांसमोर आश्वासन दिलेलं! राज्यसभेवरुन शिंदेसेनेत नाराजीनाट्य, माजी खासदाराची खदखद

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरायला अवघे काही तास राहिलेले असताना शिंदेसेनेनं ज्योती वाघमारे यांना उमेदवारी जाहीर केली. पक्षातील वरिष्ठांना, दिग्गजांना मागे टाकून वाघमारेंनी राज्यसभेचं तिकीट मिळवलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर शिंदेसेनेत नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे. माजी खासदारानं याबद्दल मनातील खदखद बोलून दाखवली आहे. राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यासाठी ४ पक्षांकडून ७ नावं जाहीर करण्यात आली आहेत. ७ जागांसाठी ७ उमेदवार रिंगणात असल्यानं निवडणूक बिनविरोध होईल. शिंदेसेनेकडून माजी खासदार आनंदराव अडसूळ, राहुल शेवाळे, संजय निरुपम, प्रवक्त्या शायना एनसी यांची नावं चर्चेत होती. मात्र या दिग्गजांना मागे टाकून ज्योती वाघमारे यांनी बाजी मारली. यानंतर अडसूळ यांनी त्यांची नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. वरिष्ठांच्या मनात जे होतं, ते झालं. आता त्यावर अधिक बोलणं मला योग्य वाटत नाही, अशा शब्दांत आनंदराव अडसूळ यांनी मनातील खंत बोलून दाखवली. केंद्रीय मंत्री अमित शहांपासून अनेकांनी आश्वासनं दिली. राज्यपाल करणार असं सांगितलं. त्याला २ वर्षे लोटली. या कालावधीत १० राज्यपाल नियुक्त झाले. पण माझा नंबर लागला नाही, असं अडसूळ म्हणाले. शेवटी मीच ऑफर दिली. राज्यपाल पदाचा विषय सोडा, तुमच्या कोट्यातून राज्यसभा तरी द्या. माझी मागणी काही चुकीची नव्हती. प्रत्येक वेळी हो हो म्हटलं जातं. पण होत काहीच नाही. त्यांनी दिलेलं नाही आणि भविष्यात देणारही नाहीत. हा माझा अनुभव आहे, अशा शब्दांत अडसूळ यांनी नाराजी व्यक्त केली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना अमित शहांसमोर बैठक झाली होती. तेव्हा लिखित प्रस्ताव दिला होता. अडसूळांना राज्यपालपद देऊ असं सांगितलं. पण ते काही दिलं नाही. राज्यपालपद मिळेना, तर किमान राज्यसभा तरी द्या म्हटलं. तर तेही नाही, अशा शब्दांत अडसूळ यांना त्यांची कैफियत मांडली. आपण पाच वेळा खासदार राहिलो. सहावेळा संसदरत्न पुरस्कार पटकावला, हे सांगायलाही अडसूळ विसरले नाहीत.






ज्योती वाघमारेंचं नाव आज आम्ही ऐकलं. त्यांना राज्यसभेची उमेदवारी मिळाल्याचं आज शेवटच्या क्षणी समजलं, असं अडसूळ म्हणाले. राज्यसभेसाठी तुम्ही यापुढेही पाठपुरावा करावा करणार का, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर आता थांबलेलं नाही. जेव्हा वाटेल तेव्हा देतील. आतापर्यंत बराच पाठपुरावा केला, असं अडसूळ म्हणाले.

# बुलडाणा अर्बनच्या वतीने गिरडा घाटात २१ किमी मॅरेथॉन उत्साहात संपन्न...

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलडाणा अर्बन यांच्या वतीने आयोजित २१, आणि १०, किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धा आज गिरडा घाट परिसरात मोठ्या उत्साहात पार पडली. या मॅरेथॉनमध्ये तब्बल १००० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवत फिटनेस, आरोग्य व सामाजिक जाणीवेचा संदेश दिला. या फॉरेस्ट मॅरेथॉन २१ किलोमीटर दोन्ही १८ ते ४५ वयातील गटांतील प्रथम स्पर्धेत पुरुष मध्ये आकाश बारवाल, गौरव हिवाळे, जीवन भालके, तर महिला गटातून रितू तळमळे,प्रणिता पाटील, रती महाजन, ४५ वयातील पुढील पुरुष व महिला राजेश कोचे, प्रशांत राऊत, अजबराव आखरे, महिला गटातून राधिका दमाणी, डॉ अनिता राठोड, वैशाली बडगुजर, यांनी प्रथम क्रमांक प्राप्त करून या स्पर्धेवर मोहोर उमटवली. यावेळी मॅरेथॉन स्पर्धेत १० किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेमध्ये पुरुष व महिला १८ ते ४५ या गटातील विजेते पुढील प्रमाणे आहे. यश पांडे, सागर मोरे,विदेश वाघ, तृप्ती जाधव, सोनाली पाठक, मृणाल पडोसळे, १० किलोमीटर ४६ या पुढील वयातील पुरुष व महिला शरद खिल्लारे, महेश महाजन, संजय तेली , तर महिला अनिता युवराज कापरे, अनुपमा मोटवानी, मंगल गवई आदींनी विजय संपादन केला. गिरडा येथील स्वयंप्रकाश संस्थान येथे सकाळी लवकर बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, जिल्हा पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांच्या सह बुलडाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी संस्थेचे अध्यक्ष डॉ सुकेश झंवर आणि बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ कोमलताई झंवर आ संजय गायकवाड, पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे, नितीन चौधरी गिरडा चे सरपंच श्रीमती सुनिता गायकवाड अनंताभाऊ देशपांडे यांनी मॅरेथॉनला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली . या स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच ही स्पर्धा पुर्ण करणाऱ्या सहभागी सर्व धावकांना बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने पदके देण्यात आली. स्पर्धेला मदत करणाऱ्या सर्व पंच व अधिकाऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी ज्यांनी परिश्रम घेतले अशा सर्वांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.या स्पर्धेत सहभागी धावकांसाठी बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. धावनपथावर ठिकठिकाणी पाणी,फळे, बिस्किटे यांचे स्टॉल लावण्यात आले होते. प्रथमच गिरडा येथे अतिशय सुंदर अशा या फॉरेस्ट मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.धावकांनी या दरम्यान पर्यटनाचा सुध्दा आस्वाद घेतला. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक व समारोप बुलडाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष डॉ सुकेश झंवर यांनी केले. या कार्यक्रमाला क्रिडाप्रेमी व गिरडा वासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धेदरम्यान स्वयंसेवक, वैद्यकीय पथक व पोलीस प्रशासनाने




चोख बंदोबस्त ठेवत कार्यक्रम यशस्वी केला. मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्या स्पर्धकांचे आयोजकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.यशस्वी आयोजना बद्दल ज्ञानगंगा फॉरेस्ट रणर ग्रुप, रणरागिणी रनिंग ग्रुप तसेच सहभागी स्पर्धकांनीही समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.एकूणच बुलडाणा अर्बनच्या या ५ किमी मॅरेथॉनने शहरात आरोग्य, फिटनेस आणि उत्साहाची लाट निर्माण केली असून युवकांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. सदर स्पर्धेसाठी बुलडाणा अर्बन संस्थेचे कर्मचारी, सहकार विद्या मंदिर चे विद्यार्थी व शिक्षकोत्तर कर्मचारी आणि ज्ञानगंगा फॉरेस्ट रणर ग्रुप व रणरागिणी रनिंग ग्रुप यांच्या अथक परिश्रमातून यशस्वी करण्यात आला.

# महागाईचा सांगावा



इराण-इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील युद्ध पश्चिम आशियाच्या प्रदेशात लढले जात असले, तरी त्याचा फटका साऱ्या जगाला बसणार हे स्पष्ट होते; इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने ही झळ आता इतरत्र पोहोचत आहे. सागरी मार्गाने होणाऱ्या एकूण तेलवाहतुकीपैकी २० टक्के वाहतूक जिथून होते, ती सामुद्रधुनी बंद झाल्याने जगाला आता तेलाच्या संकटाला सामोरे जावे लागेल. सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांच्या हत्येनंतर सूडभावनेने पेटलेला इराण अशा प्रकारची कारवाई करू शकतो, ही भीती अखेर खरी ठरली. इराणच्या या कृतीमुळे भारताच्या तेलाच्या आयातीपैकी सुमारे ५० टक्के तेलाचा पुरवठा आटण्याची भीती आहे. पूर्वी महायुद्धाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, साठेबाजी आणि महागाई यांच्या कहाण्या जुन्या पिढीकडून अनेकांनी ऐकल्या असतील; त्यांची आठवण या निमित्ताने आल्यावाचून राहत नाही. भारताकडे दीड महिना पुरेल, एवढा तेलाचा साठा असल्याने सध्या तरी याबाबत देश सुस्थितीत असल्याचे सरकारने म्हटले आहे; मात्र युद्ध अधिक काळ लांबल्यास हे संकट गहिरे होऊ शकते. त्यातच ट्रम्प यांनी, हे युद्ध दीर्घ काळ चालेल, असे भाकीत वर्तवल्याने त्याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागणार, असे दिसते. उलटपक्षी इराणकडून इस्रायलसह आखाती देशांवर क्षेपणास्त्रांचा भडिमार सुरू आहे. या हल्ल्यांच्या जोडीने होर्मुझची सामुद्रधुनीही इराणने बंद केली. येथून वाहतूक केल्यास जहाजांना आग लावण्याचाही इशाराही इराणी लष्कराकडून देण्यात आल्याने वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहे. जगाच्या आर्थिक नाड्या आवळण्यासाठीच इराणने हे दबावतंत्र अवलंबले, हे उघड आहे. ओमानच्या आखातामधून अरबी समुद्राला जोडणाऱ्या मार्गावरील होर्मुझच्या सामुद्रधुनीचा हा चिंचोळा पट्टा जागतिक व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. तो वाहतुकीसाठी बंद झाल्याने तेल पुरवठादार आणि आयातदार अशा दोन्ही बाजूंची अडचण होईल. सौदी अरेबिया, इराक, कुवेत, बहारीन, संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि खुद्द इराण या प्रमुख उत्पादकांकडून तेलनिर्यात रोखल्यास या देशांची कोंडी होणार आहे; त्यामुळेच कतारने द्रवरूप नैसर्गिक वायूचे उत्पादनही तूर्तास थांबवले आहे. त्याशिवाय या तेलावर अवलंबून असलेल्या भारत, चीन, जपान या देशांपुढे ऊर्जासंकट उभे राहिले आहे. १९८०नंतर हा मार्ग अव्याहत सुरू आहे. काही काळापूर्वी इराणच्या युद्धसरावाच्या निमित्ताने हा मार्ग अंशतः बंद राहिल्याने झालेल्या सहा टक्के दरवाढीमुळे या संकटाची चुणूक दिसून आली होती. होर्मुझच्या मार्गाला तेलवाहिनीसारखे पर्याय पुरेसे नाहीत आणि व्यवहार्यसुद्धा नाहीत. चीननेही हा मार्ग सुरू ठेवण्याचे आवाहन इराणला केले; तसेच ट्रम्प यांनीही तेलवाहतुकीच्या जहाजांना सुरक्षा पुरवण्याचे आश्वासन दिले असले, तरी येथील व्यापार मंदावणार, यात शंका नाही. भारताच्या इंधनाच्या गरजेपैकी ८५ टक्के तेल आयात केले जाते आणि त्यापैकी ५० टक्के पुरवठा होर्मुझच्या मार्गाने होतो. युद्ध लांबले आणि हा ओघ आटला, तर कच्च्या तेलाचे प्रतिबॅरलचे दर शंभर डॉलरपर्यंत वाढण्याची भीती आहे. त्यामुळे देशात पेट्रोल-डिझेलच्या दरांत वाढ होण्याची शक्यता आहे. इंधनखर्च वाढल्यास वाहतुकीचा खर्च वाढून ही परिस्थिती जीवनावश्यक वस्तूंसह एकूण महागाईला निमित्त ठरते. त्यात साठेबाजी आणि कृत्रिम दरवाढीचीही भर पडण्याची भीती आहे. त्यामुळे परकीय चलनातून होणारा आयातखर्च वाढणार आणि विकासदरावरसुद्धा परिणाम होण्यासारखी संकटे क्रमाने संभवतात. गेल्या काही काळात भारताने रशिया किंवा अमेरिकेसारखे पर्याय अवलंबून तेलखरेदीमध्ये वैविध्य साधण्याचे प्रयत्न केले असले, तरी अद्याप हे उद्दिष्ट दूर आहे आणि युद्धाने होणाऱ्या परिणामांपासून पूर्णतः दूर राहणे जागतिकीकरणाच्या काळात शक्य नाही. पुरवठा साखळी विस्कळित झाल्याने खतांच्या पुरवठ्यावरही परिणाम होण्याची भीती आहे. दुसरीकडे आखाती देशांमध्ये जाणारी फळे, भाजीपाला; विशेषतः युद्ध लांबल्यास आंब्याची निर्यातही अडचणीत येऊन शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो. रशिया-युक्रेन आणि गाझापट्टीतील युद्धापाठोपाठ सुरू झालेल्या या तिसऱ्या युद्धामध्ये हार-जीत कोणाचीही झाली, तरी जागतिक अर्थव्यवस्थेतील याचे अनर्थ स्पष्ट दिसत आहेत. मात्र, अगदी आत्तापर्यंत अनेक युद्धे थांबवल्याचे दावे करून शांततेचे ‘नोबेल’ मिळवण्याचे मार्ग खुंटल्यावर आता संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प महाशयांना रोखणार कोण, हा प्रश्न आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पवारांना पाठिंबा द्या, काँग्रेसच्या दिल्ली हायकमांडचा राज्यातल्या नेत्यांना फोन, वडेट्टीवारांनी बातमी सांगितली

**मुंबई :** राज्यसभा निवडणुकीसाठी भाजपकडून आज चार उमेदवारांची अधिकृतपणे घोषणा करण्यात आली. यानंतर आता विरोधी पक्षांकडून देखील लवकरच उमेदवाराची घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी निवडणूक पार पडत आहे. या ७ पैकी ६ जागांवर म हायुतीचे उमेदवार जिंकून येण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीला केवळ एका जागेवर यश मिळण्याची शक्यता आहे. पक्षीय बलाबल पाहता भाजपचे ४, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रत्येकी १ असे महायुतीचे ६ उमेदवार जिंकून येऊ शकतात. तर महाविकास आघाडीचा केवळ एक उमेदवार जिंकून येऊ शकतो. या एका जागेसाठी म हाविकास आघाडीत रस्सीखेच बघायला






मिळत होती. पण अखेर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाच महाविकास आघाडीकडून उमेदवारी जाहीर होऊ शकते अशा घडामोडी बघायला मिळत आहेत. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत सूचक वक्तव्य केलं आहे.राज्यसभेच्या एका जागेसाठी महाविकास आघाडीत महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी (३ फेब्रुवारी) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांनी उद्धव ठाकरेंच्या 'मातोश्री' निवासस्थानी जावून भेट घेतली. या भेटीवेळी शरद पवार यांना राज्यसभेची उमेदवारी महाविकास आघाडीकडून दिली जावी किंवा शरद पवारांना राज्यसभेच्या उमेदवारीसाठी पाठिंबा मिळावा, अशी चर्चा झाल्याची माहिती आहे. जयंत पाटील यांनी उद्धव ठाकरेंच्या भेटीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया देताना याबाबत माहिती दिली होती. एक-दोन दिवसांत याबाबतचा निर्णय निश्चित होईल, असं त्यांनी जाहीर केलं होतं. यानंतर आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महत्त्वाचं वक्तव्य केलं आहेआम्हाला आमच्या प्रभारींकडून फोन आला. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, खासदार राहुल गांधी, सोनिया गांधी यांनी शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांना पाठिंबा देवून राज्यसभेवर पाठवलं पाहिजे, असं त्यांचं एकमत झालं. त्यामुळे उद्या शरद पवार महाविकास आघाडीचे उमेदवार ठरतील. पण अजूनही तीन पक्ष एकत्र बसून याबाबत निर्णय घेत नाहीत तोपर्यंत हा अंतिम निर्णय आहे, असं समजण्याचं कारण नाही', अशी सूचक प्रतिक्रिया विजय वडेट्टीवार यांनी दिली.दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनीदेखील याबात सूचक ट्विट केलं आहे. 'काँग्रेसने म हाराष्ट्रातील राज्यसभेबाबत अखेर निर्णय घेतला आहे! महाविकास आघाडी एक आहे एकत्र राहील! जय महाराष्ट्र!', असं संजय राऊत म्हणाले आहेत.

## मविआकडून राज्यसभेसाठी शरद पवार ; ५९ वर्षांचा ट्रॅक रेकॉर्ड कायम राहणार ?

**मुंबई :** महाविकास आघाडीकडून राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. याबद्दलची घोषणा काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत शरद पवार यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस शपच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे आभार मानले. राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. शरद पवार रिंगणात उतरल्यानं राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यातील ४ जागा महाविकास आघाडीच्या आहेत. मविआच्या ४ खासदारांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपणार आहे. एकूण ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होईल. महाविकास आघाडीकडे केवळ १ जागा जिंकण्याइतकं संख्याबळ आहे. मविआत शिवसेना उबाठाचे २०, काँग्रेसचे १६ आणि राष्ट्रवादी शपचे १० आमदार आहेत. त्यांची बेरीज ४६ च्या घरात जाते. राज्यसभेची १ जागा जिंकण्यासाठी ३७ मतांची गरज आहे. काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत खासदार सुप्रिया सुळेंनी शरद पवारांच्या नावाची घोषणा केली. राज्यसभेसाठी शरद



पवारांच्या नावाला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांचे आभार मानले. 'महाविकास आघाडीतील पक्षांची साथ कायम राहणार आहे. आम्ही पूर्ण ताकदीनं एकमेकांना साथ देऊ. काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांनी मोठं मन दाखवलं, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे,' असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार, बंटी पाटील यावेळी उपस्थित होते.

पण शिवसेना उबाठाचा एकही नेता पत्रकार परिषदेला हजर नव्हता. या गैरहजेरीबद्दल सुळे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर खासदार संजय राऊत आताच शरद पवारांना सिल्व्हर ओकवर येऊन भेटून गेले. त्यांनी तब्येतीची विचारपूस केली. उद्धव ठाकरेंनी उमेदवारीला पाठिंबा दिला. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे, असं सुळे म्हणाल्या.

## युद्ध चालू असतानाच ट्रम्प करणार मोठी घोषणा

**मुंबई :** अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफला 'बेकायदेशीर' असल्याचे सांगितल्यावर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी १०% सार्वत्रिक आयात शुल्क लागू केले होते, पण आता टॅरिफच्या दरात लवकरच पुन्हा एकदा मोठी वाढ करण्याची तयार सुरु आहे. इराणमध्ये इस्रायलच्या साथीने हल्लाबोल करणारे डोनाल्ड ट्रम्प आता जगावर पुन्हा एकदा टॅरिफ 'बॉम्ब' टाकायची तयारी करत आहेत.

अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी अमेरिका लवकरच १०% सार्वत्रिक आयात शुल्क १५% पर्यंत वाढवू शकते असे संकेत दिले आहेत. सीएनबीसीशी बोलताना बेसंट म्हणाले की हा बदल या आठवड्यात होण्याची शक्यता असून हा बदल राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार धोरणातील आणखी एक मोठा बदल मानला जात आहे.गेल्या महिन्यात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने डोनाल्ड ट्रम्प यांच्या जुन्या टॅरिफ रचनेचा मोठा भाग रद्द केला.त्यानंतर, ट्रम्पने १०% नवीन सार्वत्रिक टॅरिफ लागू केला, पण सध्याच्या कायद्यानुसार नवीन टॅरिफ फक्त १५० दिवसांसाठीच लागू राहू शकतात असे बेसंट यांनी स्पष्ट केले.

## वैद्यकीय महाविद्यालयाचे नामाधिकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरच

**पुणे :** बारामतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नामाधिकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बारामती असे ३१ मे २०२३ च्या शासन निर्णयानुसार केले आहे. या महाविद्यालयाच्या नावात कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे स्पष्टीकरण वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बारामती या महाविद्यालयास संलग्नित असलेल्या ५०० खाटांच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालय बारामती या संस्थेचे नाव स्व. अजित (दादा) पवार सर्वोपचार रुग्णालय, बारामती असे करण्यात आले आहे. असा शासन निर्णय २ मार्च २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.यापूर्वी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील अनेक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यांना संलग्नित रुग्णालयांची नावे स्वतंत्रपणे निश्चित करण्यात आली आहेत.१) ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई महाविद्यालयास संलग्नित असलेल्या रुग्णालयास सर जे.जे. समूह रुग्णालय, मुंबई,बी.जे. शासकीय



वैद्यकीय महाविद्यालय पुणे संलग्नित रुग्णालयास ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे,डॉ. वैशंपायन शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय सोलापूर संलग्नित रुग्णालयास छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर संलग्नित रुग्णालयास छत्रपती प्रमिलाराजे स्मृती रुग्णालय, कोल्हापूर असे असल्याचेही वैद्यकीय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या ३ जानेवारी २०१३च्या शासन निर्णयान्वये बारामती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ५०० रुग्णखाटांचे संलग्नित रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता दिली होती.

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाला पूर्णविराम, जयंत पाटलांचं सूतोवाच

**नवी दिल्ली :** 'विलीनीकरणाची चर्चा अजित पवार यांच्या आग्रहाने सुरू झाली होती. मात्र, त्यांच्या निधनानंतर ही चर्चा पूर्णपणे थांबली आहे. आता विलीनीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही, कारण दोन्ही बाजूंच्या भावना समजून घेणारा नेताच आपल्यात नाही. त्यामुळे यापुढेही ते होण्याची सूतराम शक्यता नाही', अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते आमदार जयंत पाटील यांनी बुधवारी केली. पाटील यांच्या या वक्तव्यामुळे विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.अजित पवार यांच्याकडून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची तयारी सुरू होती. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (शप) पक्षातील उमेदवारांनी अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'च्या घड्याळ या



चिन्हावर निवडणूक लढवली होती. मात्र, अजित पवार यांच्या अकाली निधनाने या प्रक्रियेला खीळ बसली. सुनेत्रा पवार यांनी पक्षाची सूत्रे हाती घेतल्यानंतरही विलीनीकरणाबाबत काहीही भाष्य केले नव्हते. त्यामुळे दोन्ही पक्ष एकत्र येणार की, कसे याविषयी प्रश्न उपस्थित झाले होते.

अखेर याविषयी जयंत पाटील यांनी बुधवारी स्पष्ट भूमिका मांडली. दोन्ही पक्षांतील कार्यकर्ते आणि नेत्यांची भावना समजून घेणारा नेताच राहिला नसल्याने त्या चर्चेचा प्रश्नच उद्भवत नाही. विलीनीकरणाची चर्चा अजित पवार यांच्या आग्रहाने सुरू झाली होती. यापुढेही विलीनीकरणाची सुतराम शक्यता नाही, असे पाटील म्हणाले.दरम्यान, राज्यसभेच्या सातव्या जागेसाठी विरोधी पक्ष म हाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची उमेदवारी निश्चित झाल्याने राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे आहेत.

विधानसभेतील संख्याबळ लक्षात घेता राज्यसभेची एक जागा महाविकास आघाडीच्या वाट्याला येणार होती. त्यामुळे या एका जागेवरून आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना (उबाठा) पक्ष या तिन्ही पक्षांत जोरदार रस्सीखेच होती.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत विलीनीकरणाची चर्चा सुरू झाल्याने काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) पक्ष पवारांच्या नावाला फारसे अनुकूल नव्हते. त्यामुळे आघाडीत सातव्या जागेवरून गोंधळ होता.दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील आणि सुप्रिया सुळे यांनी बुधवारी संयुक्त पत्रकार परिषदेत राज्यसभा निवडणुकीत शरद पवार हे आघाडीचे उमेदवार असतील, अशी घोषणा केली. काही दिवसांपूर्वी संसदीय राजकारणाची ६० वर्षे पूर्ण केलेले शरद पवार हे तिसऱ्यांदा राज्यसभेत जाणार आहेत.

# मोहळकरवर गोळीबारानंतर रोहित पवारांचं पहिलं ट्विट, गुन्हेगारी टोळ्यांच्या मुसक्या आवळण्याची मागणी

**अहिल्यानगर :** जामखेडमध्ये गुंड सागर मोहळकर याच्यावर गोळीबाराची घटना घडली आहे. या गोळीबारात तो गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. जामखेड शहरातील न्युरानी कॉलनीत बुधवारी सायंकाळी दुचाकीवरुन आलेल्या अज्ञात आरोपींनी सागरवर गोळ्या झाडल्या. कुख्यात सागर मोहळकर याच्यावर अज्ञात हल्लेखोराने सात राऊंड फायर केले. यापैकी चार गोळ्या अंगात घुसल्याने त्याची प्रकृती गंभीर आहे. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तसेच घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेनंतर कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट केलं आहे. त्यांनी या घटनेवर आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.घटनेनंतर आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया देत प्रशासनावर जोरदार शब्दांत निशाणा साधला. 'माझ्या मतदारसंघात जामखेडमध्ये गेल्या काही काळापासून







गुन्हेगारी वेगाने फोफावत आहे. गुन्हेगारांकडून गोळीबाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे सामान्य माणसांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. यासंदर्भात अनेकदा आवाज उठवला तरी या घटनांना आळा घालण्यास पोलीस प्रशासनाला यश आलेलं नाही', असं रोहित पवार ट्विटमध्ये म्हणाले.आजही सागर मोहोळकर या तरुणावर गोळ्या झाडण्यात आल्या असून तो गंभीर जखमी आहे. पोलीस प्रशासनाने हे गुन्हेगार आणि त्यांच्या टोळ्यांच्या मुसक्या आवळून त्यांचा समूळ नायनाट करावा आणि सामान्य माणसासाठी दहशतमुक्त वातावरण निर्माण करावं. तसंच सरकारनेही या गोष्टीकडं गांभीर्याने लक्ष द्यावं, ही विनंती', अशी मागणी रोहित पवार यांनी आपल्या ट्विटमध्ये केली आहे.सागर मोहळकर हा नुकताच नाशिक मध्यवर्ती कारागृह येथून जामीनावर बाहेर आला होता. त्याच्यावर ३०७ सह विविध गंभीर गुन्हे दाखल आहेत. अशा पार्श्वभूमीवर पुन्हा झालेल्या गोळीबारामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. आता आमदारांच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## आमच्या मुलीशी संबंध का ठेवतोस? तरुण अन महिलेला बेदम मारहाण

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यात एक मोठी घटना उघडकीस आली आहे. नातवाईकांमधील विवाहित महिलेसोबत अनैतिक संबंध ठेवल्याच्या रागातून एका २२ वर्षीय तरुणाला जबर मारहाण करून त्याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. बिलोली तालुक्यातील मौजे थडीसावळी गावात ३ मार्च रोजी सकाळी ही घटना घडली आहे. दुर्गेशसिंह ठाकूर असं मयताचं नाव आहे. विशेष बाब म्हणजे, आरोपींनी हत्येपूर्वी दुर्गेशसिंह याला राहत्या घरून उचलून थडीसावळी येथे आणले, त्यानंतर महिलेला आणि दुर्गेशसिंहला मारहाण केल्याची माहिती आहे. या प्रकरणी रामतीर्थ पोलिसांनी महिलेच्या पतीसह सात जनांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.मयत दुर्गेशसिंह ठाकूर हा बिलोली तालुक्यातील मुतण्याळ येथील रहिवासी असून तो इलेट्रीशनचं काम करत होता. त्याचं थडीसावळी येथील जवळच्या नातलगातील एका महिलेसोबत अनैतिक संबंध सुरु होते. याची माहिती महिलेच्या कुटुंबाना मिळाली. त्यानंतर महिलेचा



पती पद्मसिंह ठाकूर याच्यासह वडील भाऊ आणि इतर नातेवाईक ३ मार्च रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास मयताच्या घरी पोहोचले. त्याला जबरदस्तीने उचलून आणून थडीसावळी येथे आणले. 'आमच्या मुलीशी संबंध का ठेवतोस?', असं म्हणत आरोपींनी दुर्गेशसिंह आणि महिलेला केबलच्या वायरने मारहाण केली. दुर्गेशसिंह याच्या गुप्तांगावर लाथा मारण्यात आल्याने त्याची प्रकृती गंभीर झाली. त्यानंतर त्याला उलट्या होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.दरम्यान, घटनेनंतर गावात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी पद्मसिंह गंगासिंह ठाकूर, राजूसिंह गंगासिंह ठाकूर, गंगासिंह हनुमानसिंह ठाकूर (सर्व रा. थडीसावळी). दिलीपसिंह ठाकूर, विजयसिंह ठाकूर, विशालसिंह ठाकूर, प्रतापसिंह ठाकूर (सर्व रा. निर्मल तेलंगणा) यांना अटक करत हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

## मूळचा ठाण्याचा, पुण्यातील तरुणींना प्रपोज, नकार येताच विकृत्य कृत्य ; तरुणाला पोलिसांकडून अटक

**पुणे :** सोशल मीडियावरून मुलींशी मैत्री करायचा, ओळख वाढली की प्रपोज करायचा आणि समोरच्या मुलीने प्रतिसाद दिला नाही की त्या मुलीच्या नावाचे फेक अकाउंट काढून तिची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करायचा. अशाच पद्धतीने १० ते १५ मुलींना फसवणाऱ्या नराधमाला शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली आहे.

रमेश सुरेश म्हात्रे (वय ४०) असं आरोपीचं नाव असून तो मूळ ठाण्याचा रहिवासी आहे. सध्या वसई-विरार परिसरात तो वास्तव्यास असून आरोपी मुलींचा नकार मिळाल्यावर सूड उगवण्यासाठी त्यांच्या नावाने बनावट अकाऊंट तयार करून त्या कॉलगर्ल असल्याचा आभास निर्माण करायचा. त्यामुळे संबंधित तरुणींना अश्लील फोन आणि मेसेज येऊ लागायचे.या प्रकरणाचा तपास शिवाजीनगर पोलीस ठाणे येथील सायबर पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने केला. कोणताही ठोस धागा नसताना मोबाईल ट्रॅकिंगच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आलं. नुकतीच त्याला विरार येथून अटक





करण्यात आली.याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने स्वतःच्या वाहिनीसोबतही असाच प्रकार केल्यामुळे भावाने घरातून हाकलून दिले होते. त्यानंतर बाहेर वेटर, सेक्युरिटी गार्ड असे मिळेल ते काम तो करत असे. आरोपीच्या मोबाईलमध्ये अनेक तरुणींचे फोटो सापडले असून घराच्या झडतीत आक्षेपार्ह साहित्यही जप्त करण्यात आलं आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून अशा प्रकारांना बळी पडलेल्या इतर तरुणींनी पुढे येण्याचं आवाहन करण्यात आले आहे. मी इस्रो मध्ये शास्त्रज्ञ आहे असं सांगत एका इसमाने पुण्यातील २८ वर्षांच्या आयटी इंजिनिअर मुलीची तब्बल ४२ लाख ६४ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. लग्नासाठी मॅट्रिमोनियल साइटवर ओळख झाल्यानंतर त्याने सुरुवातीपासूनच स्वतःची मोठी ओळख सांगितली. गोड बोलून विश्वास जिंकला, लग्नाचं आमिष दाखवलं आणि काही बनावट कागदपत्रंही पाठवली. नंतर फसवणूक झाल्याचं लक्षात आल्यानंतर मुलीने वाकड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

## १६००० चालकांवर कारवाई, २ कोटींचा दंड, २०० ठिकाणी नाकाबंदी

**मुंबई :** होळी आणि धुळवड या दोन दिवसात मुंबई पोलिसांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या तब्बल १६७२७ चालकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. दारू पिऊन वाहने चालविणाऱ्या १५९ मद्यपी चालकांची या विशेष मोहिमेत धरपकड करण्यात आली. यासाठी पोलिसांनी संपूर्ण मुंबईत सुमारे दोनशे ठिकाणी नाकाबंदी लावली होती. मुंबईमध्ये होळी आणि धुळवड मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते. सणाच्या उत्साहाला कोणतेही गालबोट लागू नये यासाठी संपूर्ण मुंबईत पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. या दोन दिवसांत वाहतुकीचे नियम मोडण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असल्याने पोलीस आणि वाहतूक पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जाते. त्यानुसार सोमवार आणि मंगळवार या दोन दिवसांत पोलीस ठाणे आणि वाहतूक पोलिसांच्या वतीने विशेष मोहीम हाती



घेण्यात आली होती. या मोहिमेत वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यात आली. वाहतुकीचे वेगवेगळ्या नियम मोडणाऱ्या १६७२७ वाहनांवर ई चलान जारी करण्यात आले. या चलानच्या माध्यमातून पोलिसांनी सुमारे २ कोटी रुपयांचा दंड ठोठावला. यामध्ये सर्वाधिक ४२ लाख ९७ हजारांचा दंड विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्यांवर ठोठावण्यात आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.पोलिसांच्या वतीने ब्रेथ ॲनालायझरचा वापर करण्यात आला होता.

दारू पिऊन वाहन चालविणारे १५९ चालक या चाचणीमध्ये अडकले गेले. त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यांचे लायसन्स पुढील कारवाईसाठी आरटीओकडे पाठविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. दरम्यान, या कारवाईतून नियम मोडणाऱ्या वाहन चालकांना चांगला धडा मिळाला आहे. वाहन चालक आणि इतरांच्या सुरक्षेसाठीच अशाप्रकारची कारवाई केली जाते. पोलिसांकडून वारंवार याबाबत आवाहन केलं जातं. पण तरीही अनेक जणांकडून वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन होताना दिसतं.

# दक्षिण आफ्रिका पुन्हा ठरले ‘चोकर्स’

## आफ्रिकेला नमवत न्यूझीलंड फायनलमध्ये; सामनावीर फिन अॅलनचे रेकॉर्डब्रेक शतक

**कोलकाता/वृत्तसंस्था :** येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्स मैदानावर खेळल्या गेलेल्या टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा ९ गडी राखून धुव्वा उडवला. या विजयासह न्यूझीलंडने दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तर आफ्रिकेने या स्पर्धेत आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी केली होती, परंतु उपांत्य फेरीच्या महत्त्वाच्या सामन्यात पुन्हा एकदा त्यांच्या पदरी निराशाच पडली. मोक्याच्या क्षणी कच खाण्याच्या सवयीमुळे ‘चोकर्स’ हा शिक्का पुसण्यात आफ्रिकेला पुन्हा एकदा अपयश आले असून त्यांचे विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न पुन्हा अधुरे राहिले आहे.

प्रारंभी, किवी संघाने प्रथम गोलंदाजी करताना वादळी सुरुवात केली आणि द. आफ्रिकेला १६९ धावांवर रोखले तर प्रत्युत्तरात १२.५ षटकांत १७० धावा चेस करत विक्रमी विजय मिळवला. या सामन्यात सलामीवीर फिन अॅलनने वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवताना ३३ चेंडूत १० चौकार आणि ८ षटकारासह नाबाद १०० धावा करत विजयात मोलाचे योगदान दिले. आता, फायनलमध्ये न्यूझीलंडचा सामना गुरुवारी होणाऱ्या भारत व इंग्लंड यांच्यातील विजेत्यांशी होईल.

आफ्रिकेने दिलेल्या १७० धावांच्या




लक्ष्याचा पाठलाग करताना किवी संघाने वादळी सुरूवात केली. सलामीवीर फिन अॅलन व टीम सेफर्ट यांनी पहिल्या विकेटसाठी ११७ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सेफर्ट ३३ चेंडूत ७ चौकार व २ षटकारांसह ५८ धावा करत बाद झाला. पण अॅलनने ३३ चेंडूत १० चौकार व ८ षटकारांसह नाबाद शतक झळकावत संघाला धमाकेदार विजय मिळवून दिला. रचिन रवींद्रने १३ धावा करत त्याला साथ दिली. या जोरावर किवी संघाने विजयी लक्ष्य १२.५ षटकांतच पूर्ण केले.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या आफ्रिकेची सुरुवात निराशाजनक झाली. डावाच्या दुसऱ्याच षटकात कोल मॅककॉन्चीने आफ्रिकेला सलग दोन धक्के दिले. आधी

### संक्षिप्त धावफलक

- **दक्षिण आफ्रिका :** २० षटकांत ८ बाद १६९ (डेवाल्ड ब्रेविस ३४, स्टब्स २९, यान्सेन नाबाद ५५, मॅट हेन्री आणि मॅककॉन्ची प्रत्येकी दोन बळी)
- **न्यूझीलंड:** १२.५ षटकांत १ बाद १७३ (टीम सेफर्ट ५८, फिन अॅलन नाबाद १००, रचिन रवींद्र नाबाद १३, रबाडा १ बळी).

### फिन अॅलनचे टी-२० वर्ल्डकपमधील विक्रमी शतक

- आफ्रिकेविरुद्ध उपांत्य सामन्यात फिन अॅलनने उपांत्य सामन्यात शतक झळकावत टी-२० विश्वचषक इतिहासात सर्वात जलद शतक झळकावण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे. याआधी ख्रिस गेलने २०१६ मध्ये ४७ चेंडूत वानखेडेच्या मैदानावर शतक झळकावले होते. आता अॅलनने त्याला मागे टाकत हा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे.

त्याने क्विंटन डी कॉकला ८ चेंडूत १० धावांवर बाद केले. त्यानंतर लगेचच पुढील चेंडूवर रायन रिकेल्टनला भोपळाही फोडू दिला नाही. शून्यावर माघारी पाठवत मॅककॉन्चीने आफ्रिकेची अवस्था बिकट केली. ५५ धावांवर कर्णधार एडन मार्करम (१८ धावा) रचिन रवींद्रच्या गोलंदाजीवर बाद झाला आणि तिसरा मोठा धक्का बसला. त्यानंतर १० वे आणि ११ वे षटक आफ्रिकेसाठी आणखी घातक ठरले. रचिन रवींद्रने डेव्हिड मिलरला अवघ्या ६ धावांवर बाद केले, तर पुढील षटकात कोल मॅककॉन्चीने सेट फलंदाज डेवाल्ड ब्रेविसला ३४ धावांवर माघारी धाडले. ७७ धावांवर ५ विकेट्स पडल्यावर ट्रिस्टन स्टब्स आणि मार्को यान्सेन या दोघांनी सहाव्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करत डावाला आकार दिला. मात्र १५० धावांवर लॉकी फर्ग्युसनने स्टब्सला २९ धावांवर बाद करत भागीदारी मोडली. एकीकडे विकेट्स पडत असताना मार्को यान्सेन शेवटपर्यंत खंबीरपणे उभा राहिला. त्याने अवघ्या ३० चेंडूत २ चौकार आणि ५ षटकारासह नाबाद ५५ धावांची झंझावाती खेळी करत संघाचा डाव १६९ धावांपर्यंत नेला.

# प्राग बुद्धिबळ महोत्सवात अरविंद चिदंबरमकडून गुकेशचा पराभव

**प्राग/वृत्तसंस्था :** गतविजेता अरविंद चिदंबरमने आपला देशबांधव डी. गुकेशला मागे टाकताना पाठ्यापुस्तकीय शैलीतील युक्ती शोधली. या निकालामुळे प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवाच्या मास्टर्स विभागाच्या सहाव्या फेरीच्या समाप्तीनंतर विद्यमान फिडे विश्वविजेता शेवटच्या स्थानावर पोहोचला आहे.

अरविंदच्या विजयाचा अर्थ असा की, गुकेश आता लाईव्ह रेटिंग यादीत २० व्या क्रमांकावर आहे, ज्यामध्ये विश्वनाथन आनंद त्याच्या निक्रिय स्थितीमुळे झळकलेला नाही. डिसेंबर, २०२४ मध्ये जेतेपद जिंकल्यापासून गुकेशला जागतिक विजेता म्हणून आपला दर्जा राखण्यासाठी स्पष्टपणे संघर्ष करावा लागला आहे. जानेवारी, २०२५ मध्ये टाटा स्टील मास्टर्समध्ये तो टायब्रेकरमध्ये आर. प्रज्ञानंदकडून पहिल्या स्थानासाठी बरोबरी साधल्यानंतर पराभूत झाला होता. अलीकडच्या घसरणीत विश्वविजेता रेटिंगमध्ये पन्नासपेक्षा जास्त गुण गमावताना दिसला आहे.

अरविंदने त्याचा फिलिडोर प्रयोग वाईटरीत्या अयशस्वी झाल्यानंतर अखेर काळ्या रंगाच्या सोंगाट्या घेऊन खेळताना सिसिलियन बचावाचा अवलंब केला. गुकेशसाठी गुंतागुंत निर्माण करणे सोपे होते. सामना ज्या प्रकारे उलगडत गेला ते पाहता अरविंद बरोबरीवर समाधानी झाला असता. परंतु ४० व्या चालीवर काही सेकंद शिल्लक असताना गुकेशने निर्णायक



चूक केली. आठ चालींनंतर हा सामना संपुष्टात आला.

आश्चर्य म्हणजे दिवसाचा हा एकमेव निर्णायक सामना होता. उर्वरित चारही सामने अनिर्णित राहिले. जॉर्डन व्हॅन फॉरेस्ट ४.५ गुणांसह एकटा आघाडीवर असून स्थानिक स्टार डेव्हिड नवारा उझबेकिस्तानच्या अब्दुसत्तोरोव्ह नोदिरबेकसह अर्ध्या गुणाने मागे आणि संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर आहे. डेव्हिड आंतोन गुइजारो इराणच्या परहम मगसुदलूविरुद्धचा सामना बरोबरीत संपल्यानंतर ३.५ गुणांसह या तिघांच्या जवळ आहे. जर्मनीचा व्हिन्सेंट कीमर आणि उझबेकिस्तानचा नोदिरबेक याकुबबोएव्हसह अरविंद पुढील स्थानावर आह। तर निमन १.५ गुणांसह गुकेशच्या वर आहे. पाच निर्णायक सामन्यांनंतर फॉरेस्टला अखेर नवाराने बरोबरीत रोखले. मास्टर्स विभागात जागतिक महिला विश्वचषक विजेत्या दिव्या देशमुखने थॉमस बर्डसेनसोबत बरोबरी साधली.

# उपांत्य फेरीत भारतासमोर आज इंग्लंडचे आव्हान

**मुंबई/वृत्तसंस्था :** टी-२० विश्वचषक उपांत्य फेरीत भारताला आता धोकादायक इंग्लंडच्या फिरकी माऱ्याच्या आव्हानाचा सामना करावा लागणार आहे. आज गुऊवारी वानखेडे स्टेडियमवर हा उच्च दबावाचा सामना होईल. स्पर्धेच्या सुऊवातीला विश्वचषकाचे सर्वांत भक्कम दावेदार मानल्या गेलेल्या भारताला स्पर्धेत बऱ्याच संघांविऊद्ध परिपूर्ण खेळ करता आलेला नाही. तथापि, सुपर ८ मध्ये दक्षिण आफ्रिकेकडून झालेल्या पराभवानंतर त्यांनी लवचिक दृष्टिकोन स्वीकारून स्वत:मध्ये चांगल्या सुधारणा घडविलेल्या आहेत.

पॉवरप्लेमध्ये वरच्या फळीतील तीन डावखुऱ्या फलंदाजांची साखळी तोडण्यासाठी संजू सॅमसनला संघात परत आणण्यात आले आणि त्या डावपेचाने उत्तम निकाल दिलेले आहेत. वेस्ट इंडिजविरुद्धच्या त्या विशेष प्रयत्नानंतर या ३१ वर्षीय खेळाडूचा आत्मविश्वास उंचावला असेल आणि भारताला आशा असेल की त्याचा सलामीचा साथीदार अभिषेक शर्मा याचाही आत्मविश्वास दुणावलेला असेल. अभिषेकला आत्मविश्वास वाढवणाऱ्या खेळीची नितांत आवश्यकता आहे.

सॅमसनची परीक्षा घेण्यासाठी जोफ्रा आर्चरकडून आखूड टप्प्याच्या चेंडूंचा वर्षाव होण्याची अपेक्षा आहे, तर पॉवरप्लेमध्ये विल जॅक्स त्याच्या ऑफस्पिनने शमला त्रास देऊ शकतो. डावखुरा फिरकी गोलंदाज लियाम डॉसननेही पहिल्या सहा षटकांत गोलंदाजी केली आहे. त्याशिवाय यजमानांना मधल्या षटकांत धूर्त आदिल



रशिदविऊद्ध सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. मंगळवारी तीन तासांच्या सराव सत्रात सलामीवीर आणि उर्वरित भारतीय फलंदाजांनी त्या सर्व आव्हानांना लक्षात घेतले असल्याचे दिसून आले.

स्पर्धेतील खळबळजनक सुऊवातीनंतर इशान किशनने निराशा केली आहे आणि तो त्याच्या माजी आयपीएल संघाच्या घरच्या मैदानावर आक्रमक होण्याची इच्छा बाळगेल. राष्ट्रीय संघातील सध्याचे मुंबई इंडियन्सचे स्टार खेळाडू कर्णधार सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि हार्दिक पांड्या यांच्या बाबतीतही अशीच स्थिती असेल. त्यांनी उपांत्य फेरीपूर्वी मुख्य नेट सत्रात दोन तासांपेक्षा जास्त वेळ फलंदाजी केली. संघाच्या ध्येयाला मदत करण्यासाठी क्रमात खाली हलवण्यात आलेल्या तिलकने मधल्या फळीत सर्वांना प्रभावित केले आहे.

येथील लहान मैदानावर अक्षर पटेल आणि वऊण चक्रवर्ती या फिरकी जोडीला चुकीसाठी जागा राहणार नाही. जसप्रीत बुमराह नेहमीप्रमाणे उत्कृष्ट कामगिरी करत आहे, परंतु शेवटच्या पाच षटकांतील गोलंदाजीत थोडी सुधारणा आवश्यक आहे. शिवम दुबे हा धोकादायक सहावा गोलंदाजी पर्याय असल्याचे सिद्ध झाल्याने सूर्या त्याच्या संसाधनांचा कसा वापर करतो, हे पाहणे रंजक असेल. कुलदीप यादवला खेळवण्याची कल्पना नेहमीच आकर्षक असते. पण भारत त्यांच्या अंतिम संघात फेरफार करण्याची शक्यता कमी आहे.

भारत आणि इंग्लंड हे दोघेही सलग तिसऱ्या टी-२० विश्वचषक उपांत्य फेरीत एकमेकांविऊद्ध उभे ठाकले आहेत. २०२२ मध्ये इंग्लंडने भारताला जेतेपदाच्या मार्गावर पराभूत केले होते, तर २०२४ मध्ये गयाना येथे झालेल्या सामन्यात भारताने त्याचा बदला घेतला होता. यंदाच्या विश्वचषकात इंग्लंड हॅरी ब्रूक आणि जॅक्स यांच्या वैयक्तिक प्रतिभेवर अवलंबून असून या दोघांनी त्यांना कठीण परिस्थितीतून बाहेर काढले आहे.

# रश्मिका-विजयच्या रिसेप्शनला हॉलिवूड ते बॉलिवूडपर्यंत कोण कोण आलं?

**मुंबई :** सध्या सर्वत्र रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा यांच्या लग्नाची चर्चा पाहायला मिळत आहे. नुकताच रश्मिका-विजयचा शाही रिसेप्शन सोहळा पार पडला. या सोहळ्याचे फोटो आणि व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे. रश्मिका आणि विजय २६ फेब्रुवारीला उदयपूरमध्ये लग्न बंधनात अडकले. त्यांचा लग्न सोहळा कुटुंब आणि जवळचा मित्र परिवार यांच्यात थाटामाटात साजरा झाला. मात्र रिसेप्शनला बॉलिवूड, हॉलिवूडचे मोठे कलाकार पाहायला मिळाले. यांनी वधू-वरांना शुभ आशीर्वाद आणि प्रेम दिले. रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा यांनी देखील कलाकारांचे हात जोडून सुंदर स्वागत केले. त्यांना मिठी मारली.

रश्मिका-विजयला आशीर्वाद देण्यासाठी हॉलिवूड आणि बॉलिवूडचे कलाकार पाहायला मिळाले. यात साउथ इंडस्ट्रीतील मेगास्टार चिरंजीवी, नागार्जुन अक्किनेनी, राम चरण, अल्लू अर्जुन, रवि तेजा, म हेश बाबूची बायतो नम्रता शिरोडकर आणि मुलगी सितारा, राधिका सरथकुमार यांच्यासह अनेक मोठ्या कलाकारांचा समावेश होता. तर बॉलिवूडमधून मृणाल ठाकुर, रिया चक्रवर्ती , करण जौहर, नीना गुप्ता आणि



कृती सेनॉन हे कलाकार उपस्थित होते. रश्मिका-विजयला आशीर्वाद देण्यासाठी हिंदी, तमिळ, तेलगू, मल्याळम आणि कन्नड इंडस्ट्रीतील प्रसिद्ध कलाकार आले होते. रश्मिका-विजयचे चाहते त्यांच्यावर प्रेम ाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत.

रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा यांचे ४ म र्च २०२६ला हैदराबादमध्ये थाटामाटात रिसेप्शन पार पडले. रश्मिकाने रिसेप्शनसाठी लाल रंगाची गोल्डन काठ असलेली साडी नेसली होती. ज्यावर सुंदर वर्क पाहायला मिळाले.

गोल्डन ज्वेलरी, केसांची वेणी, ग्लॉसी मेकअप, कपाळावर बिंदी आणि कुंकू लावून तिने हा लूक पूर्ण केला होता. विजयने साऊथ स्टाइल पांढरा कुर्ता आणि धोतर परिधान केले होते. खांद्यावर अंगवस्त्रम घेतले होते. विजय रिसेप्शन लूकमध्ये खूपच हँडसम दिसत होता. दोघांच्या केमिस्ट्रीची तुफान चर्चा पाहायला मिळत आहे.

रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडाने तेलुगू हिंदू आण कोडावा अशा दोन वेगवेगळ्या पद्धतीने लग्न केले. रश्मिका मंदाना आणि विजय देवाराकोंडा यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये हैदराबादमध्ये साखरपुडा उरकला. दोघे आता लवकरच 'राणाबली' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाच्या पोस्टरने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांनी २०१८ ला रिलीज झालेल्या 'गीता गोविंदम' आणि २०१९ साली 'डियर कॉमरेड' या दोन चित्रपटांमध्ये काम केले आहे.

## मराठमोळ्या निर्मात्याला बेदम मारहाण

**पुणे :** 'मराठी बाणा' शोचे प्रसिद्ध म राठमोळे निर्माते अशोक किसनराव हांडे (६८) यांना मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली. हांडे यांच्यावर पार्किंग खंडणीच्या कारणावरून हल्ला करण्यात आल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. कार्यालयात लाकडी क्रिकेट बॅटने हांडे यांच्यावर हल्ला करण्यात आला. माटुंगा पश्चिममध्ये हांडे यांच्या कार्यालयातच ही धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात हांडे जखमी झाले आहेत, त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करत एका व्यक्त केली अटक केली आहे. पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव प्रथमेश पांडुरंग अनफोडे उर्फ बंटी (५३) असे आहे.



अशोक हांडे यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करत तपास सुरू केला. तपास करताना पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. हांडे यांच्या चालकाने पोलिसांनी सांगितले की, घटना होण्यापूर्वी त्याच व्यक्तीने त्यांना पार्क करण्यावरून धमकावले आणि खंडणी मागितले होती. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना १ मार्च रोजी संध्याकाळी सात वाजताच्या आसपास घडली.

अशोक हांडे यांच्या माहीम येथील मनमाला टँक रोडवरील युनायटेड हाऊस येथील 'चौरंग-मराठीबाणा' या कार्यालयात तो व्यक्ती घुसला. तोडफफोड करत त्याने कार्यालयात राडा घातला होता. हांडे यांनी जाब विचारल्यानंतर बॅटने त्याने मारहाण केली. लाकडी क्रिकेट बॅटने एका व्यक्तीने हांडे यांच्यावर हल्ला केला. शिवीगाळ केली आणि कार पार्किंगवरून धमकावले, असे एफआयआरमध्ये म्हटले आहे. हप्ता दिल्याशिवाय कोणतेही वाहन पार्क करता येणार नाही, अशी धमकी हल्लेखोराने दिली होती. हांडे यांना तो व्यक्ती शिवीगाळ करत होता. हांडे यांच्यावर बॅटनेही हल्लाही केली. कार्यालयतील एका व्यक्तीने बॅट हिसकावण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी त्याने पुन्हा बॅटने मारले. तो इतक्यावरच थांबला नाही त्याने पुन्हा इमारतीबाहेर हांडे यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच कार्यालयतील एका व्यक्तीने तात्काळ पोलिसांनी याबाबत माहित दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ धाव घेत आरोपीला बेड्या ठोकल्या, गुन्हा दाखल करत पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## वर्षा उसगांवकर यांची फसवणूक

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाली आहे. वर्षा उसगांवकर यांची तब्बल ४७ लाखांना फसवलं आहे. वर्षा उसगांवकर आणि मृणालिनी जांभळे यांच्यासह अनेक अभिनेत्रींना दिग्दर्शक तसेच बांधकाम व्यावसायिक अविनाश जाधव यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहे. अभिनेत्री वर्षा उसगांवकर आणि मृणालिनी जांभळे यांची ४७ लाखांची फसवणूक झाली आहे. मुंबईतील शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीनुसार,अभिनेत्री मृणालिनी सुभाष जांभळे यांच्यासह अनेक अभिनेत्रींचा समावेश आहे.

आरोपीने मृणालिनी जांभळे आणि वर्षा उसगांवकर यांना डोंबिवली येथील एका रिअल इस्टेट प्रकल्पात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणात 'रिटर्न्स' (परतावा) देण्याचे आमिष दाखवण्यात आले.

एक वर्षाच्या आत मूळ रक्कम परत करण्याचे लेखी आश्वासनही देण्यात आले होते. एकूण ४७ लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. गुंतवणुकीची मुदत संपूनही पैसे परत न मिळाल्याने आणि आरोपीने टाळाटाळ केल्यामुळे अखेर पोलिसांत धाव घेण्यात आली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

अविनाश जाधव हे दिग्दर्शक असून व्यावसायिक आहेत. एका प्रोजेक्टमध्ये पैसे गुंतवले. अविनाश जाधव यांनी दिलेल्या एका वर्षात रिटर्न देण्याचा शब्द दिला होता. नोव्हेंबर २०१९ आणि फेब्रुवारी २०२० मध्ये तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. शयित आरोपी अविनाश जाधव याने विश्वास संपादन करण्यासाठी सुरुवातीला परतावा म्हणून सुमारे साडेचार लाख रुपये दिले होते. मात्र, त्यानंतर त्याने पैसे देणे पूर्णपणे बंद केले.

## 'ते' गाणं गायल्याचा श्रेया घोषालला आजही पश्चाताप

**मुंबई :** आपल्या आवाजाने जगाला मंत्रमुग्ध करणारी बॉलिवूडची सुरेल गायिका श्रेया घोषाल कायम आपल्या कामामुळे चर्चेत असते. आजवर तिने अनेक सुपरहिट गाणी दिली आहेत. २०१२ साली रिलीज झालेल्या 'अग्निपथ' चित्रपटातील 'चिकणी चमेली' हे गाणे श्रेया घोषालने गायले होते. जे आजही सुपरहिट आहे. 'चिकनी चमेली' गाण्यावर कतरिना कैफने भन्नाट डान्स केला होता. मात्र नुकतेच श्रेया घोषालने या गाण्यासंबंधित मोठे विधान केले आहे, ज्यामुळे गायिका चर्चेत आली आहे.

श्रेया घोषालने एका मुलाखतीत सांगितले की, 'चिकणी चमेली' सारखी गाणी भविष्यात रेकॉर्ड न करण्याचा ठाम निर्णय तिने घेतला आहे. श्रेयाने स्पष्ट केले आहे की, जरी तिने 'चिकणी चमेली' हे गाणे



गायले असले आणि अजूनही ते संगीत कार्यक्रम ांमध्ये सादर केले जाते, तरी भविष्यात अशी गाणी रेकॉर्ड न करण्याचा ठाम निर्णय तिने घेतला आहे. या गाण्यानंतर श्रेया घोषाला अनेक टीकांना आणि ट्रोलिंगला सामोरे जावे लागले.

श्रेयाने राज शमानीला पॉडकास्टमध्ये सांगितले की, ''चिकनी चमेली'च्या जबरदस्त यशानंतर तिला अनेक नवीन गाणी मिळाली. परंतु त्यापैकी बहुतेक गाण्यांचे बोल तिला खूप अस्वस्थ करणारे होते. त्यामुळे तिने अशी गाणी गाणे टाळले...' 'चिकनी चमेली' गाणे गायल्यावर श्रेया घोषाला ट्रोल करण्यात आले होते. तेव्हा तिची वादग्रस्त विधाने चर्चेत होती. यावर बोलताना श्रेया घोषाल म्हणाली की, 'मी वादग्रस्त बोलले नव्हते...मी इतकच म्हणाले की, मी लहान मुलांसमोर हे गाणं गाऊ शकत नाही. मला नाही योग्य वाटत. 'चिकनी चमेली' या गाण्यात फार अश्लील वगैरे असे काही नव्हतं.' श्रेया घोषाल पुढे म्हणाली की, 'चिकनी चमेली' रेकॉर्ड केले तेव्हा ती प्रत्येक शब्दामागील खोल अर्थ समजून घेण्याइतकी प्रौढ नव्हती.' श्रेयाचा वय आणि अनुभवानुसार ती तिच्या संगीताबद्दल अधिक काळजी घेऊ लागली आहे. तिला कळलं की, एकदा गाणे हिट झाले की, तिला ते सर्वत्र गायले पाहिजे अगदी मुलांसमोरही ज्यामुळे कधीकधी विचित्र परिस्थिती निर्माण होऊ शकते.

शेवटी श्रेया घोषाल म्हणाली की, 'मी ते गाणे गायले आणि मला ते आवडले... स्टेजवर गाणे सादर करण्यास मला कोणतीही लाज वाटत नाही कारण ते माझे काम आहे. पण हो, मला आता अशी गाणी रेकॉर्ड करायची नाहीत. हे एक असे गाणे आहे जे, नेहमीच माझ्यासोबत राहील, ज्यावर आज लहान मुलेही नाचतात. कधीकधी मी स्टेजवर गाताना माझे डोळे बंद करते, पण ते माझे गाणे आहे म्हणून मी ते नाकारू शकत नाही...'

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार गाळ काढण्याच्या कामाचे सूक्ष्म नियोजन करा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारफ्या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत गाळ काढण्याच्या कामासाठी संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले. जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचा आढावा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद जलसंधारण अधिकारी, कृषी अधिकारी तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले की, जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूरप्रवण क्षेत्रातील गावांची प्रत्यक्ष पाहणी करून त्या भागातील नदी व नाल्यांचे खोलीकरण प्राधान्याने हाती घ्यावे. अपूर्ण राहिलेली कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर द्यावा. गाळ काढण्याची कामे येत्या १५ दिवसांत स्वयंसेवी संस्थांना देण्यात येतील, असे नियोजन करण्याचेही त्यांनी निर्देशित केले. गाळमुक्त धरणगाळयुक्त शिवारफ अभियानामुळे धरणातील




साठवण क्षमता वाढून शेतजमिनींची सुपीकता सुधारण्यास मदत होणार आहे. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे जलसंधारणाला चालना मिळून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

---

# ईश्वर चिठ्ठीद्वारे लाभार्थी निवड ९ मार्च रोजी




जनसंचलन/बुलढाणा

महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ थेट लाभ हस्तांतरण () पद्धतीने देण्यात येणार आहे. या योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांमधून ईश्वर चिठ्ठीद्वारे निवड करण्यात येणार असून हा कार्यक्रम सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद बुलढाणा येथे ऑन कॅमेऱ्यासमोर पारदर्शक पद्धतीने पार पडणार आहे. जिल्हा परिषद सेस २०२५-२६ ग्रामीण भागातील दिव्यांग महिला व दिव्यांग मुलींना पिठाची चक्की पुरविण्यासाठी २७९ प्राप्त अर्ज झाले असून संभाव्य ३० लाभार्थी निवड, सन २०२४-२५ ग्रामीण भागातील विशेष घटक प्रवर्गातील शाळकरी मुलींना लेडीज सायकल पुरविण्यासाठी ३७९ प्राप्त अर्ज असून १८५ लाभार्थ्यांची संभाव्य निवड ईश्वर चिठ्ठीद्वारे होईल. सदर निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून संबंधित पात्र लाभार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

**बचत करा रू. ५०० प्रती माह पासून..**



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

गुंतवणुकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

## दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत कडधान्य प्रक्रिया युनिटसाठी अनुदान

## अर्ज करण्याचे कृषि विभागाचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

देशाला कडधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनवून आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी ङ्गङ्गकडधान्य आत्मनिर्भरता अभियानफ्फ्जाहीर केले आहे. अभियानांतर्गत कडधान्य प्रक्रिया युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख प्रति युनिट इतके अनुदान दिले जाणार आहे. इच्छुक वैयक्तिक अर्जदार, संस्था, महासंघ व शेतकरी बांधवांनी काढणीपश्चात प्रक्रिया युनिट घटकाचा लाभ घेण्यासाठी ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. सन २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानाची अंमलबजावणी राज्यात रब्बी हंगाम २०२५-२६ पासून सुरू झाली आहे.अभियानांतर्गत तूर, उडीद व मसूर या प्रमुख कडधान्य पिकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार असून उत्पादनवाढीसोबतच मूल्यवर्धनावर भर देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने काढणीपश्चात



पायाभूत सुविधा बळकट करण्यावरही विशेष भर देण्यात येत आहे. सन २०२६-२७ या वर्षात काढणीपश्चात प्रक्रिया युनिट ( ) स्थापन करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या घटकासाठी वैयक्तिक अर्जदार, शेतकरी उत्पादक संस्था (), क्लस्टर स्तर महासंघ (), प्राथमिक कृषी पतसंस्था () तसेच महाराष्ट्रातील विविध कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत उपक्रम व संस्था पात्र राहतील. योजनेअंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के, कमाल रु. २५ लाख प्रति युनिट इतके अनुदान देय राहणार आहे. त्यामुळे कडधान्य प्रक्रिया, स्वच्छता, ग्रेडिंग, पॅकेजिंग आदी सुविधा उभारून स्थानिक स्तरावर मूल्यवर्धनाला चालना मिळणार आहे. इच्छुक वैयक्तिक अर्जदार, व शेतकरी बांधवांनी काढणीपश्चात प्रक्रिया युनिट घटकाचा लाभ घेण्यासाठी ऑफलाईन पद्धतीने तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. घटकाच्या अंमलबजावणीसंदर्भात कृषी विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचना लागू राहतील. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या चरणी चिमुकल्यांची शब्दांजली

## तांदुळवाडी अंगणवाडीत रंगला ३७८ व्या बीजेचा भक्ती सोहळा




जनसंचलन/ सिंदखेडराजा

आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे ।।ङ्घङ्घ या उक्तीप्रमाणे अवघ्या महाराष्ट्राला भक्तीच्या सागरात न्हाऊ घालणाऱ्या विश्ववंदनीय जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा आज ३७८ वा सदेह वैकुंठगमन सोहळा (तुकाराम बीज) मोठ्या उत्साहात साजरा झाला. या मंगल दिनाचे औचित्य साधून तांदुळवाडी रुम्हणा ग्रामपंचायत, जांभोरा बीट ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा येथील अंगणवाडी केंद्रात चिमुकल्या वारकऱ्यांनी अभंगांचा गजर करत जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांना भावपूर्ण अभिवादन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांना वंदन करण्यात आले.तर अंगणवाडीतील बालचमूंनी साडेतीनशे वर्षांहून अधिक काळ जनमानसावर अधिराज्य गाजवणाऱ्या संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचे गायन केले.यावेळी कोहिनूर खरात, वेदिका नागरे, पंकज काळे, तन्वी पांचाळ, ज्योती खरात आणि नीलम काळे या विद्यार्थ्यांनी आपल्या बोबड्या बोलांतून विठ्ठल-विठ्ठल नामाचा जयघोष करत उपस्थित सर्वांची मने जिंकली.अंगणवाडी सेविका प्रिया तेजकोर प्रकाश खरात यांनी विद्यार्थ्यांना जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथा ग्रंथाचे महत्त्व आणि त्यांच्या साध्या-सरळ जीवनपद्धतीची ओळख करून दिली. त्यांना अंगणवाडी मदतनीस सौ. साधना राजरत्न खरात यांनी मोलाचे सहकार्य केले.या भक्तिमय सोहळ्याला गावातील दरूबाई खरात, सुनिता खरात, गोदावरी खरात आणि जागृती काळे या महिलांची व ग्रामस्थांची प्रमुख उपस्थिती होती. ३७८ व्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीजेनिमित्त अंगणवाडीत राबवण्यात आलेल्या या आध्यात्मिक उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिल्हास्तरीय

## अस्मिता लीग क्रीडा स्पर्धेचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली नेहरु युवा केंद्र( ) व जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तालुका क्रीडा संकुल, चिखली येथे जिल्हास्तरीय अस्मिता लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १३ वर्षाखालील, १३ ते १८ वयोगट व १८ वर्षावरील मुली व महिलांसाठी आयोजित करण्यात आली असून, १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धांचा समावेश आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी अस्मिता पोर्टल या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी खेलो इंडिया प्रशिक्षक अक्षय गोलांडे (मो.९९७५१०५२२२) तसेच जिल्हा युवा समन्वयक आकाश साळोक (मो. ८३७९८९०१०१) यांच्याशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुली व महिलांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर व जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८